महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
**जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग**
हिराकोट तळयाजवळ, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनी क्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्स क्र:०२१४१-२२७४५१❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्र.मशा/जमीन/अ-०३/कांदळवन/तक्रार क्र.६२/हरेश कडू/२०२० 10373 दिनांक:-२४ /०९/२०२०.

प्रति,
मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,३०२ बेक फिल्ड हाऊस, ,
तिसरा मजला, ब्रिटानिया रेस्टॉरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय
आवक - 1124
दिनांक - 15/10/2020.
मुख्य लेखापाल अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक

**विषय:- गोफण नदी किनारी असणाऱ्या कांदळवनाची बेकायदेशीर तोड केल्याबाबत. (तक्रार क्र.६२) श्री.हरेश नरेश कडू, मु.गोफण, पो.शेडसई, ता.रोहा.**

**संदर्भ:- आपल्या कार्यालयाकडील ई-मेल संदेश दि.११/०३/२०१९.**

सर्वे 14/10/2020

मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री.हरेश नरेश कडू, मु.गोफण, पो.शेडसई, ता.रोहा, जि.रायगड यांनी रोहा तालुक्यातील गोफण नदी किनारी असणाऱ्या कांदळवनाची बेकायदेशीर तोड केल्याबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी खारभूमी विकास उपविभाग मुरुड, पोलिस निरीक्षक रोहा, वनक्षेत्रपाल रोहा यांचेमार्फत सखोल चौकशी करुन, उपविभागीय अधिकारी रोहा यांनी या कार्यालयाकडे सादर केलेल्या अहवालान्वये केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**कांदळवन/पाणथळ तक्रारींचा पुर्तता अहवाल**

Bring it to notice of DCF(Mangroves)
VPG 16/10

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नांव व दिनांक | श्री.हरेश नरेश कडू<br>तक्रार अर्ज दि.११/०३/२०१९. ई-मेल व्दारे<br>मा.उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष मुंबई<br>(या कार्यालयाकडे प्राप्त दि.१२/०३/२०१९) |
| २ | तक्रारीचा विषय | गोफण नदी किनारी असणाऱ्या कांदळवनाची (खारफुटी) या झाडाची बेकायदेशीर तोड केल्याबाबत. |
| ३ | तक्रारीशी संबधित जागेचा तपशील उदा.स.नं. गावाचे नांव, तालुका | मु.गोफण, पो.शेडसई, ता.रोहा, जि.रायगड<br>(गोफण नदी किनारी असलेली जागा) |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नांव व पदनाम | उपविभागीय अधिकारी रोहा, तहसिलदार रोहा, उपविभागीय अधिकारी, खारभूमी विकास उपविभाग मुरुड, वनक्षेत्रपाल रोहा, पोलिस निरीक्षक रोहा, |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | उपविभागीय अधिकारी रोहा यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.उविअ/जमिनबाब/कात-४/कांदळवन/८६१/१६१/२०१९, दि.२९/११/२०१९ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर केलेला आहे.<br>शासन महसूल व वन विभागाकडील शासन निर्णय क्र..एस.-१०/२०१५/अनौ.३०/प्र.क्र.४६२/फ-३/दि.१६ऑक्टोंबर २०१८ अन्वये तालुका स्तरीय कांदळवन समिती गठीत केलेली आहे.सदर समितीचे अध्यक्ष उपविभागीय अधिकारी रोहा, व सदस्य व सचिव तहसिलदार रोहा ,पोलीस निरीक्षक रोहा, गटविकास अधिकारी |

पंचायत समिती रोहा, परिक्षेत्र वन अधिकारी रोहा, मुख्याधिकारी नगर परिषद रोहा व मंडळ अधिकारी रोहा यांनी दिनांक १३/०११/२०१९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता तक्रारदार व ग्रामस्थ यांचे समक्ष स्थळ पाहाणी केली, तसेच तक्रारदार यांचा जबाब नोंदविणेत आला.

**श्री.हरेश नरेश कडू व श्री.दिनेश पांडुरंग कडू यांचा दि.१३/११/२०१९ रोजी नोंदविलेला जबाब पुढील प्रमाणे:-**

दिनांक १३/११/२०१९ रोजी सायंकाळी ४.०० वाजता नोंदविलेल्या जबाबामध्ये श्री.हरेश नरेश कडू व श्री.दिनेश पांडुरंग कडू, रा.गोफण, ता.रोहा ,जि.रायगड यांनी असे नमुद केले आहे की, माहे जानेवारी -२०१९ पासून स्मशान भुमि लगत आप्पाच्या खाडी किनारी कांदळवनाची कत्तल चालु असलेबाबत , मा.जिल्हाधिकारी कार्यालय, उपवनसंरक्षक कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय रोहा, पोलीस ठाणे रोहा इत्यादी ठिकाणी अर्ज करुन खारलँड करुन बांधबंदिस्तीचे काम चालू असल्याचे कळविले होते. सदरचे काम हे पुजा कंस्ट्रक्शन मार्फत चालू होते. हे काम खाजगी ठिकाणी काही अंशी व शासकिय ठिकाणी काही अंशी आहे. त्या क्षेत्रावरील खाजगी कांदळवनातील झाडांच्या फांद्या व काही झाडे संपुर्ण तोडण्यात आली होंती. खाजगी मालकीच्या जागा ज्या आहेत तेथील शेतक-यांनी कोणत्याही प्रकारे तक्रारी नोंदविल्या नाहीत. शासकिय जागेवरील असल्यामुळे शासनास कळविले आहे. ब-याच वेळा कळवूनही शासनाच्या विभागाने कोणतीही दखल घेतलेली नाही. बांधबंदीस्तीचे काम हे १ जानेवारी २०१९ रोजी सुरु झाले, त्यानंतर फॉरेस्ट विभागाच्या अधिका-यांनी भेट दिली. त्यांनतर काम पुन्हा जोमाने सुरु केल्याने तोडलेली झाडे भरावात बुजून गेली व काही अवशेष पाण्याच्या प्रवाहात खाडी मध्ये वाहून गेले. पावसाळा सुरु होण्याच्या अगोदर पर्यत शासनाच्या विविध विभागांना दिलेल्या तक्रारींचा पाठपुरावा करुनही कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. तसेच पोलीस विभागाकडे माझा चुलत भाऊ याचा जबाब नोंदविला होता त्यावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही.

मा.अवर सचिव यांना कळवुनही कुठलीही कार्यवाही झालेली नाही. याबाबत शासनाला इ-मेल व्दारे कळविले होते. तसेच पर्यावरण विभागाचे पत्र आले होते. त्यावरही कोणतीही कार्यवाही झालेली नाही. तक्रार देवुन अकरा महिन्याचा कालावधी होवुन गेल्यामुळे कोणतेही पुरावे शिल्लक राहीलेले नाहीत. तरी माझ्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही होण्यात यावी. सदरचे काम करताना भरावासाठी वापरलेली माती ही मौजे - शेडसई येथील गट नं.४९५/५ या सिलींगच्या जमिनीतून उत्खनन करुन आणलेली आहे. उत्खननाच्या परवानगीसाठी जोडलेला ७/१२ वापरुन चुकीच्या पध्दतीने वापर केला आहे. यावरुन असे आमचे म्हणणे आहे की, शासनाचीही फसवणुक केलेली आहे.(सदर माती उत्खननाचे काम हे पुजा कंन्स्ट्रक्शन यांनी केलेले आहे) फसवणुक केल्यामुळे संबधिता विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात यावा.असे समक्ष उपस्थित राहून म्हणणे नोंदविले आहे.

**उपविभागीय अधिकारी, खारभूमी विकास उपविभाग, मुरुड (जंजिरा)रायगड यांचा अहवाल:-**

या कार्यालयाकडील या पूर्वीच्या कागदपत्राचे अवलोकन केले असता व माहिती घेतले असता उपविभागीय अधिकारी ,खारभूमी विकास उपविभाग, मुरुड (जंजिरा) रायगड यांनी त्यांचेकडील जा.क्र.खाभूवि/उपवि/मुरुड /प्रशा/१८/२०१९ दि.१४/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये गोफण खारभूमी योजना, ता.रोहा, जि.रायगड या योजनेच्या सा.क्र.० ते ९३० मी. मधील बांधाचे बांधकाम व सा.क्र.३८० मी. वरील उघाडीचे बांधकाम विभागीय कार्यालयीन निविदा क्र.ब-१/३८ सन २०१७-१८ नुसार ४४०२ मृद व जलसंधारण, भांडवली खर्च (राज्यनिधी ) अंतर्गत काम प्रगती

| | | |
|---|---|---|
| | | पथावर आहे. सदर योजनेसाठी केंद्र शासनाचा पर्यावरण खात्यामार्फत मंजूर असलेल्या ५७५ खारभूमी योजनांमध्ये गोफण खारभूमी योजनेचा समावेश असून, सदर योजनेस केंद्र शासनाच्या सी.आर.झेड कायद्यापासून सूट देण्यात आलेली आहे. गोफण खारभूमी योजना ता.रोहा या योजनेचे काम खारभूमी विकास उप विभाग मुरुड (जंजिरा) या कार्यालयाच्या अखत्यारित आहे. सदर योजनेचे काम हे जुन्या बांधाच्या संरेखेत (Alignment) चालू आहे. दि०७/०१/२०१९ रोजी दैनिक सागर व दि.११/०१/२०१९ रोजी दैनिक रायगड टाईम्स वृत्तपत्रातील बातमीनुसार कांदळवनाच्या तोडीशी या खात्याचा अगर आम्ही नेमलेल्या ठेकेदाराचा कोणताही संबंध नाही. गोफण खारभुमी योजना, ता.रोहा या योजनेचे काम सद्या नेमलेल्या ठेकेदारामार्फत आमच्या निरीक्षण व मार्गदर्शनांखाली योग्य रितीने चालू आहे. शासनाच्या माध्यमातून सन २०१७-१८ मंजूर झालेल्या लोकोपयोगी कामात गत दीड वर्षात काही समाजकंटकांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये व इतर तक्रारीव्दारे कामात अडथळे आणण्याचा वारंवार प्रयत्न करीत आहेत. असे अहवाल नमुद केले आहे.<br>**<u>वनक्षेत्रपाल रोहा यांचा अहवाल:-</u>**<br>वनक्षेत्रपाल रोहा यांचेकडील पत्र जा.क्र.गुन्हे/८२८/सन २०१७-१८ दि.०२/०१/२०१९ चे पत्रान्वये त्यांनी स्वत: दि.०२/०१/२०१९ रोजी समक्ष जागेवर जाऊन खात्री केली असता, प्रस्तुत ठिकाणी काही कांदळवन प्रजातीची झाडांची तोड केल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच काही कांदळवन प्रजातीच्या झाडांच्या फांद्या देखील छाटणेत आल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि तोड झालेले ठिकाण हे वनविभागाच्या ताब्यातील नसून मालकी क्षेत्रातील असल्याचे निदर्शनास आल्याचे कळविले आहे. तसेच त्यांचेकडील पत्र जा.क्र.गुन्हे/ ८५२/सन २०१७-१८ दि.०७/०१/२०१९ रोजीचे पत्रान्वये पोलीस निरीक्षक रोहा यांना त्यांचेकडील पत्र जा.क्र.ब/गुन्हे /८२८,दि.०२/०१/२०१९ अन्वेय पुढील तपासाकामी व कार्यवाहीसाठी कळविले आहे.<br>**<u>पोलीस निरीक्षक ,रोहा पोलीस ठाणे यांचा अहवाल :-</u>**<br>पोलीस निरीक्षक रोहा यांनी त्यांचेकडील पत्र जावक क्रमांक ९१०/२०१९ दिनांक ०७/०३/२०१९ रोजीचे पत्रान्वये चौकशी अहवाल सादर केलेला आहे. तक्रारी अर्जाचे चौकशीमध्ये असे निष्पण्ण होत आहे की, गोफण गावचे खाडी किनारी बांधाचे काम करण्याकरीता खारभुमी विभागाकडून पुजा कन्स्ट्रक्शन कंपनीला काम दिलेले आहे. गोफण खाडी किनारी असलेल्या जुन्या बांधावर पुजा कन्स्ट्रक्शन कंपनीने गवत काढलेले आहे. बांधाचे बाजुला काही ठिकाणी कांदळवन जातीचे झाडांची तोड तसेच काही कांदळवनं झाडांच्या फांद्या छाटण्यात आल्या असल्याचे दिसून आले. पुजा कन्स्ट्रक्शन कंपनी काम करीत असलेल्या गोफण खारभुमी योजनेचे काम हे शासनाच्या जुन्या बांधावर चालु करण्यात आले आहे. कांदळवन प्रजातीचे झाडांची झालेली तोड व कांदळवन झाडांच्या फांद्या छाटण्यात आलेल्या आहेत. ती जागा हि वनविभागाच्या ताब्यातील नसुन ती मालकी क्षेत्रातील असल्याचे वनविभाग यांनी कळविले आहे. अर्जदार यांनी त्यांचे जबाबामध्ये गोफण गावातील १)शशिकांत गणपत कडू २)बाळु गणपत कडू ३)अमोल सुभाष शिंगरे व ४)अभिजीत अशोक शिंगरे यांनी ठेकेदार पुजा कन्स्ट्रक्शन कंपनी यांचे संमतीने तोडलेली आहेत असे सांगीतले आहे. परंतु गोफण गावातील वरील चार इसम हे अर्जदार यांचे विरोधी राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आहेत. त्यांच्यात राजकीय वाद चालू आहेत. कांदळवनाचे झाडांची तोड करताना कोणीही कोणाला प्रत्यक्ष पाहिलेले नाही. अर्जदार व गोफण गावातील वरील चार इसम हे एकमेकांवर खोटे आरोप करीत आहेत. गोफण गावातील शेतक-यांचे जमीनीमध्ये खाडीचे पाणी घुसल्याने त्यांची शेती नापीक झाली होती. त्याबाबत |

| | | |
|---|---|---|
| | | खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग पेण रायगड, यांनी गोफण ग्रामस्थांचे मागणीनुसार त्यांचे खाडी किनारी बांधाचे कामाची शासनाकडून मंजूर घेऊन त्याची निविदा मागविणेत आली होती. सदर कामाची निवीदा माझे कंपनीला मिळावी या करीता मी ई-टेंडरींग प्रक्रियेव्दारे खारभूमी विभागाकडे टेंडर भरला होता. सदर कामाची निवीदा मिळणेकरीता गोफण गावातील तक्रारदार हरेश नरेश कडु व दिपक कडू यांनी देखील खारभुमी विभागाकडे एस.एस.कन्स्ट्रक्शन कंपनीमार्फत कामाचे टेंडर भरले होते. खारभुमी विभागाकडून गोफण येथील बांधाचे कामाचा ठेका दिनांक २१/०८/२०१७ रोजी पूजा कन्स्ट्रक्शन कपंनी यांना देण्यात आला. व त्या कामाचा ठेका हरेश नरेश कडु व दिपक कडु यांना मिळालेला नसल्याने ते नाराज झालेले आहेत.<br>तसेच पोलीस निरीक्षक रोहा यांनी पुजा कन्स्ट्रक्शन कंपनीचे मालक श्री.नारायण गोसावी यांचेकडे कांदळवन झाडाचे तोडीबाबत चौकशी केली असता त्यांनी कोणत्याही प्रकारच्या कांदळवन झाडांची तोड केली नसल्याचे तसेच तसेच झाडांच्या फांद्या तोडल्या नसल्याचे सांगत आहेत. सदर योजनेचे काम हे खारभुमी विभागाचे निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली योग्य रितीने चालू असल्याचे व कांदळवनाच्या तोडीशी या खात्याचा अगर खात्याने नेमलेल्या ठेकेदाराचा कोणताही संबंध नसल्याचे खार भुमी विभागाचे उप विभागीय अधिकारी श्री.वि.के.कार्ले यांनी त्यांचे लेखी पत्राव्दारे पोलीस निरीक्षक रोहा यांना कळविले आहे. तसेच गोफण गावातील शेतकऱ्यांकडे विचारपुस केली असता कांदळवन झाडांची तोड कोणी केली आहे याबाबत त्यांना देखील माहिती नाही. त्यामुळे गोफण खाडी किनारी कांदळवन झाडांची तोड कोणी केली आहे. हे चौकशीमध्ये तपासात निष्पण्ण होत नसल्यामुळे त्यांनी गुन्हा दाखल केलेला नाही. सदरचे योजनेचे काम हे शासनाचे आहे त्याकरीता शासनाच्या सी.आर.झेड कायद्यामधुन सुट देण्यात आली आहे. पुजा कन्स्ट्रक्शन कंपनी ही खारभुमी विभागाचे निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली काम करीत आहे. सदर योजनेचे काम करीत असताना पुजा कंन्स्ट्रक्शन कंपनीचा गुन्हा करण्याचा हेतु दिसून येत नाही. अर्जदार हरेश नरेश कडू यांना शासनाकडुन सदर योजनेचे काम मिळाले नाही या रागापोटी व पुजा कंन्स्ट्रक्शन कंपनीने ते काम करु नये या उद्देशानेच सदरचा तक्रारी अर्ज केलेला आहे. तरी सदरचा तक्रारी अर्ज फाईल हाणेस विनंती केली आहे.<br>**ग्रामस्थ मंडळ गोफण यांचे दिनांक १८/११/२०१९ रोजीचे निवेदन:-**<br>ग्रामस्थ मंडळ गोफण यांनी दिनांक १८/११/२०१९ रोजी त्यांचे म्हणणे सादर केले आहे की, सन २००७ रोजी खारभूमी योजना कार्यालय पेण यांचेकडे बांध बंदिस्ती करण्यासाठी ग्रामस्थांच्या वतीने शेतक-यांनी अर्ज केला होता. त्या बांधावर आमचे पंजोबा व आजोबा सर्व शेतकरी एकत्र येऊन बांधाची दुरुस्ती करायचे. कालांतराने तिथे खारभूमी योजनेने भराव केला होता. परंतु भरतीच्या पाण्याने त्या बांधाची मोठया प्रमाणात धूप होत गेली. व बांध जमीनदोस्त झाला. तसेच वारंवार रोहा धाटाव एमआयडीसीचे दुषित पाणी आणि इंन्डोएनर्जी कोळसा कंपनीचा कोळसा भरतीच्या पाण्याबरोबर शेतात जाऊन शेती नापीक झाली. शेतात शेती करणे कठीण झाले. एकामागोमाग सर्व शेतक-यांनी शेती करणे सोडुन दिले. त्यामुळे शेतक-यावर उपासमारीची वेळ आली. शेतातील बांधबंदिस्ती होण्याकरीता ग्रामस्थ व शेतक-यांनी खारभूमी पेण कार्यालयाकडे वारंवार फे-या मारुन त्यांचा पाठपुरावा केला. तसेच मा.आ.सुनिलजी तटकरे,साहेब आणि स्थानिक आमदार मा.पंडित शेठ पाटील, यांचे प्रयत्नाने सन २०१७ रोजी सदर काम मंजूर होऊन कामाची वर्क ऑर्डर मिळाली. व ते काम पुजा कंन्ट्रक्शन या संस्थेला मिळाले. परंतु गावातील काही |

एक, दोन समाज कंटकांना त्या कामाचा ठेका मिळाला नाही. म्हणून त्या योजनेवर हे समाजकंटक वारंवार तक्रारी करत होते. म्हणजेच लाईन आऊट करण्यासाठी येणा-या अधिका-यांना धमकावणे, तसेच आम्हाला विचारल्याशिवाय कामाला सुरुवात करु नये.व ठेकेदारांनी आम्हाला भेटण्यास यावे. कामाला वर्कऑर्डर कशी मिळाली असे अनेक अडथळे करीत असत. ही बाब शेतक-यांच्या निदर्शनास अधिका-यांनी आणून दिली, त्यामुळे आम्ही शेतकरी खारभूमी अधिका-यांना घेऊन कामाची लाईन आऊट करण्यापासून ते काम पुर्ण होईपर्यत स्वत: शेतकरी व ग्रामस्थ वेळोवेळी बांधावर जाऊन ठेकेदाराकडून समाधानकारक काम करुन घेतले. तसेच नविन झालेल्या बांधाचे काम हे कोणत्याही कांदळवनाच्या झाडाला धक्का न लागता जुन्या बांधावरुन काम करुन घेतले. परंतु ज्या तक्रारी आपल्या कार्यालयाकडे प्रलंबित आहेत त्या मध्ये केवळ त्रास देणे हाच त्यांचा हेतु आहे. तक्रारी नुसार ग्रामस्थांना व शेतक-यांना कांदळवनाच्यां झाडाची कत्तल झाल्याचे दिसून आले नाही. आम्हा शेतक-यांची अशी मागणी आहे की, शेतात असलेल्या लहान कांदळाच्या झाडांबाबत शासनाकडून योग्य ते मार्गदर्शन मिळावे. आम्हा शेतक-यांना त्या. शेती व्यतिरिक्त दुसरी शेती नाही. श्री.दिनेश पांडुरंग कडू यांनी या कार्यालयाकडे केलेली तक्रार ही बिनबुडाची आहे. असे आम्हा ग्रामस्थांना व शेतक-यांना वाटते, ग्रुप ग्रामपंचायत शेडसई यावर माहितीचा अधिकार टाकणे, गोफण गावच्या नदी किनारी मेरीटाईम बोर्डाकडुन झालेल्या कामाचे माहितीचे अधिकार टाकणे, गोफण गावातील दशक्रिया विधी इमारतीवर माहितीचा अधिकार टाकणे, रास्तभाव धान्य दुकान गोफण विषयी तक्रार व माहितीचा अधिकार टाकणे अशा तक्रारी ते वारंवार करत असतात.

गावातील १४ वित्त आयोगाच्या सर्व कामांवर नविन खार भूमी योजने आंतर्गत झालेल्या कामाचे फायदे:- कुंडलिका नदीच्या पुराचे पाणी शेतात आत येण्याचे थांबले, बांधामुळे आमच्या शेतीची धूप कमी झाली, भरतीचे पाणी आत येण्याचे त्याचबरोबर दुषित पाणी तसेच कोळसा कंपनीचे पाणी शेतामध्ये येण्याचे बंद झाले, शेतीमध्ये उगवलेले गवत ,पाम ,कोलशिंदे ,मारवेल हे हळुहळु सुकून चालले आहेत. झालेल्या बांधामुळे जंगलातील पावसाचे येणारे पाणी सर्वत्र शेतीमध्ये पसरायचे ते सुरुळीतपणे जाऊ लागले आहे. तसेच या बांधामुळे शेतक-यांना मासे व खेकडा मिळू लागले. त्यामुळे उपजिवीकेचे साधन तयार झाले आहे. बांध झाल्यामुळे , श्री.रामचंद्र बालजी कडू व सुभाष भास्कर शिंगरे, या शेतक-यांनी लागवड केली व तेथे चांगल्या प्रकारे भाताचे पिक मिळाले. श्री.दिनेश पांडुरंग कडू, यांच्या अर्जाचा विचार न करता ठेकेदार पुजा कंस्ट्रक्शन यांना बांधाचे उर्वरीत काम पुर्ण करण्यास मान्यता देण्यात यावी. तसेच ही शेती आम्हा शेतक-यांना या वर्षी लागवड करता येईल.

**मौजे-गोफण,ता.रोहा येथे दिनांक १३/११/२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजता तालुका स्तरीय कांदळवन समितीने केलेला स्थळ पहाणी अहवाल:-**

दिनांक १३/११/२०१९ रोजी दुपारी ४.०० वाजता, गोफण खाडी किनारी कांदळवन तोडी संदर्भात तालुका स्तरीय कांदळवन समिती, तसेच तक्रारदार व स्थानिक ग्रामस्थ यांचेसह पहाणी केली त्यावेळी गोफण खाडी किनारी बांध बंदिस्तीच्या ठिकाणी नव्याने तुर्तास तरी कांदळवन झाडाची तोड झाल्याचे निदर्शनास आले नाही. सदर जागेत खाडी किनारी ब-यापैकी कांदळवन वृक्ष असून त्याची वाढ चांगली असल्याचे दिसून येत असून पर्यावरणाचा व कांदळवन प्रजातीचा -हास झाल्याची परिस्थिती आढळून येत नाही. बांधाचे काम पूर्ण झाल्याचे आढळून आले.

वरील सर्व अहवालाच्या अनुषंगाने असे निदर्शनास येते की,

| | | |
|---|---|---|
| | | तक्रारदार यांनी नमुद केलेली जमिन ही खाजगी असून खाजगी जमिनी ज्यांच्या मालकीच्या आहेत, त्यांनी कांदळवन झाड तोडीबद्दलं कोणतीही तक्रार नोंदविलेली नाही. स्वत: अर्जदार यांनी त्यांचे जबाबात तसे नमूद केले आहे. त्याच प्रमाणे उपविभागीय अधिकारी, खारभुमी विकास उपविभाग मुरुड यांनी सादर केलेल्या अहवालानुसार केंद्र शासनाच्या पर्यावरण खात्यामार्फत मंजूर असलेल्या ५७५ खारभूमी योजनांमध्ये गोफण खारभूमी योजनेचा समावेश असून, सदर योजनेस केंद्र शासनाच्या सी.आर.झेड कायद्यापासून सूट देण्यात आलेली आहे. पोलीस निरीक्षक रोहा यांनी गोफण गावातील शेतक-यांकडे विचारपुस केली असता **कांदळवन झाडांची तोड कोणी केली आहे.याबाबत शेतक-यांना देखील माहिती नाही.** त्यामुळे गोफण खाडी किनारी कांदळवन झाडांची तोड कोणी केली हे चौकशीमध्ये निष्पण्ण होत नसल्यामुळे त्यांनी गुन्हा दाखल केलेला नाही. सदर योजनेचे काम करीत असताना पुजा कंस्ट्रक्शन कंपनीचा गुन्हा करण्याचा हेतु दिसून येत नाही. अर्जदार हरेश नरेश कडू व दिनेश पांडुरंग कडू यांना शासनाकडून सदर योजनेचे काम मिळाले नाही या रागापोटी व पुजा कंस्ट्रक्शन कंपनीने ते काम करु नये या उद्देशानेच सदरचा तक्रारी अर्ज केलेला आहे.असे पोलीस निरीक्षक रोहा यांनी त्याचे अहवालात नमुद केले आहे.<br>यावरुन तक्रारदार यांनी तक्रार केले प्रमाणे करणेत आलेली कांदळवन तोड ही खाजगी जमिनीतील असून त्याबाबत जमीन मालकाची तक्रार नाही. तसेच बांधाचे कामकाजास केंद्र शासनाचे खारभूमी योजनेस सी.आर.झेड कायद्यापासून सूट देण्यात आल्याचे आणि जुन्या बांधावरुन ( Alinmant) ठेवूनच भरावाचे काम पुर्ण केले आहे." मोरीचे काम बाकी " तसेच पोलीस निरीक्षक, रोहा पोलीस ठाणे यांनी तपास करुन सदरच्या प्रकरणांत गुन्हा न नोंदविता प्रकरण File करणेस कळविले आहे.आणि बांधालगतच्या ग्रामस्थांनी उपयुक्ततेबाबत लेखी निवेदन दिलेले आहे, तसेच या कार्यालयातून दिनांक १०/०५/२०१९ रोजी सादर केलेल्या परिस्थितीत आज रोजी काहीही बदल नाही. उपविभागीय अधिकारी , खारभूमी विकास उपविभाग मुरुड (जंजिरा) रायगड , पोलीस निरीक्षक रोहा,वनक्षेत्रपाल रोहा तसेच ग्रामस्थ यांचे निवेदनावरुन तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज निकाली उपविभागीय अधिकारी रोहा यांनी विनंती केली आहे. |
| ६ | कांदळवनाचा /पाणथळाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | नाही |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबधित पोलिस स्थानकाचे नांव | निरंक |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नांवे व पत्ता. | निरंक |
| ९ | कोणत्या कायदयाअंतर्गत /कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | निरंक |

सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी रोहा यांचेकडील चौकशी अहवाल, उपविभागीय अधिकारी, खारभूमी विकास उपविभाग मुरुड (जंजिरा) रायगड, पोलीस निरीक्षक रोहा, वनक्षेत्रपाल रोहा तसेच ग्रामस्थ, अर्जदार यांचा जबाब माहितीस्तव सोबत जोडला आहे.

स्थळप्रत मा.जिल्हाधिकारी यांचे सहीची असे.

(विशाल दौंडकर)
तहसिलदार (महसूल)
जिल्हाधिकारी कार्यालय रायगड